| | | | | |
|---|---|---|---|---|
| MHNG080047042015 | दाखल तारीख | २२.१२.२०१६ | | |
| | नोंदणी तारीख | २२.१२.२०१६ | | |
| | निकाल तारीख | ०७.०४.२०२६ | | |
| | कालावधी | वर्ष | महिने | दिवस |
| | | ०९ | ०३ | १६ |

## भाग –अ

| | | |
|---|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्या.क्र.१, कामठी यांचे न्यायालय**<br>**(पिठासिन अधिकारी श्री मोहन रा. कामत )**<br>**न्यायनिर्णय**<br>**(पारित दि.०७/०४/२०२४)**<br><br>**नियमित फौजदारी खटला क्र.२७८/२०१६** **निशाणी** | |
| | | अपराध क्र.७९/२०१६, पो.स्टे. – कन्हान |
| फिर्यादी – | | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस स्टेशन कन्हान, जिल्हा नागपूर. |
| अभियोग पक्ष | | सहा. सरकारी अभियोक्ता श्री. लुले |
| आरोपी | **१** | **प्रितम बबनराव पोटभरे**<br>वय – २६ वर्ष, व्यवसाय — चालक |
| | **२** | **सचिन रामप्रसाद काळे**<br>वय – २९ वर्ष, व्यवसाय — दुकानदार<br>१ व २ राह. वार्ड क्र.३, कांद्री, कन्हान. |
| | **३** | **जानू समशेर सिद्दीकी**<br>वय – २९ वर्ष, व्यवसाय — मजूरी<br>राह. धरमनगर, कन्हान. |
| आरोपी तर्फे वकील | | श्री कुशवहा, श्रीमती गजभिये |

## भाग –ब

| | |
|---|---|
| अपराध घडल्याची तारीख | १२.०७.२०१६ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १२.०७.२०१६ |
| दोषारोप पत्राची तारीख | २१.१२.२०१६ |
| दोषारोप निश्चीतीची तारीख | २७.०३.२०२३ |
| पुरावा सुरु करण्याची तारीख | १९.०६.२०२३ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | ––– |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय तारीख | ०७.०४.२०२६ |
| शिक्षेचा आदेश असल्यास त्याची तारीख | --- |

## आरोपी तपशिल

| अनु. क्र. | आरोपींचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा | खटल्याच्या वेळतील अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रितम बबनराव पोटभरे | १२.०७.२०१६ | १६.०७.२०१६ | ३८०, ४६१, ३४ भादंवि | निर्दोष | -- | -- |
| २ | सचिन रामप्रसाद काळे | १३.०७.२०१६ | १६.०७.२०१६ | वरीलप्रमाणे | निर्दोष | -- | -- |
| ३ | जानू समशेर सिद्दीकी | २७.१०.२०१६ | ३०.१०.२०१६ | वरीलप्रमाणे | निर्दोष | -- | -- |

## भाग -क

### अ- अभियोग पक्षाचे साक्षीदार

| | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | आसाराम कुंजीलाल अहिरवार | पंच साक्षीदार |
| सा.क्र.२ | शैलेश हंसराज थुल | पंच साक्षीदार |
| सा.क्र.३ | मायाबाई मुरलीधर वरठी | साक्षीदार |

### ब-आरोपींचे साक्षीदार

| | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

### क-न्यायालयीन साक्षीदार

| | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

### अ-अभियोग पक्षाचा कागदोपत्री पुरावा

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | निशाणी - ९ व १० /सा.क्र.१ | जप्ती पंचनामा (सहीपूरती) |
| २ | निशाणी - १८ /सा.क्र.२ | घटनास्थळ पंचनामा (सहीपूरती) |

### ब-आरोपींचा कागदोपत्री पुरावा

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## क–न्यायालयीन निशाणी देण्यात आलेला पुरावा

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| –– | –– | –– |

## ड–मुद्देमाल पुरावा

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | –– | एक टाटा एस गाडी क्र.MH–36–G–625 |
| २ | –– | डि.ए. पीग्रोवर गोदावरी सल्फेट खताच्या बो–या एकूण २४ |
| ३ | –– | एक सेंद्री रंगाची ताडपत्री |

अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे आहे.

विशाल गुलाटी यांनी कन्हान पोलिस ठाण्यात दि.१२.०७.२०१६ रोजी फिर्याद देउन त्यांच्या कन्हान येथील गोडाउन मध्ये सरकारी डिएपी नावाचे खत व युरिया चे ५० बॅग असलेला ट्रक पोलिसांनी पकडल्याने खत चोरीची फिर्याद दाखल केली. सदर गुन्हयाचा तपास पोलिस उपनिरीक्षक शेंडगे यांनी केला. त्याचा गुन्हा रजिस्टर क्र. ७९/२०१६ नोंदविण्यात आला.

२. तपासी अधिकारी पोलीस हवालदार श्री शेंडगे यांनी तपासाअंती दोषारोप पत्र दाखल केले. अंतिम अहवालाचे अवलोकनार्थ माझे पूर्व अधिकारी यांनी आरोपींविरुध्द भादंवि कलम ३८०, ४६१, ३४ अन्वये निशाणी ०३ कडे दोषारोप निश्चित केले व निशाणी ०४ ते ०६ कडे त्यांची जबानी नोंदविली. त्यामध्ये आरोपींनी गुन्हा ना कबूल करुन खटल्याची संपरीक्षा घेण्याची विनंती केली.

३. अभियोग पक्षाच्या पुराव्याचे अवलोकणार्थ आरोपीं विरुध्द त्यांना गुन्हयात गोवणारा पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब वगळण्यात आला व तसा आदेश निशाणी १ दि.०७.०४.२०२६ रोजी पारीत करण्यात आला.

४. सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. लुले व आरोपीं तर्फे वकील श्री. कुशवहा यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. यावरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ असून, त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षामागील कारणे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक १२.०७.२०१६ रोजी १७.४४ वाजताच्या दरम्यान के.एस.एम. गोडाउन कन्हान येथून आरोपी क्र.१ ते ३ ने संगनमत करुन समान हेत्तुच्या पुरःसरणार्थ सल्फेट खताच्या २४ बॅग माल चोरुन नेताना मिळून आले व त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम ३८० सहवाचणीय कलम ३४ अन्वये अपराध केल्याचे अभियोग पक्ष शाबीत केले आहे काय ? | नाही. |
| २ | उपरोक्त दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपी क्र.१ ते ३ ने सोबत संगनमत करुन समान हेत्तुच्या पुरःसरणार्थ कंपनीमधून फिर्यादीला नुकसान करण्याच्या उद्देशाने कंपनी उघडून खत चोरून नेले व त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम ४६१ सहवाचणीय कलम ३४ अन्वये अपराध केल्याचे अभियोग पक्ष शाबीत केले आहे काय ? | नाही. |
| ३ | आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

५. आरोपींविरुध्द भादंवि चे कलम ३८०, ४६१, ३४ अन्वयेच्या दोषसिध्दी साठी अभियोग पक्षाने हे सिध्द करणे आवश्यक आहे की आरोपींनी सल्फेट खताच्या २४ बॅग यांची चोरी केली.

### मुद्दा क्र.१ व २ करिता –

६. अभियोग पक्षाने आसाराम (सा.क्र.१) यास निशाणी ८ कडे तपासले. तसेच सा.क्र. २ शैलेश यास निशाणी १७ कडे व सा.क्र. ३ मायाबाई यांना निशाणी २३ कडे तपासण्यात आले. यापैकी सा.क्र.१ आसाराम व सा.क्र. २ शैलेश हे घटनास्थळ व जप्ती पंच आहेत. या दोघांनी सरकारी पक्षाला सहाय्य करणारी साक्ष दिलेली नाही. या साक्षीदाराने त्यांच्या समक्ष दि.१२.०७.२०१६ रोजी व दि.१३.०७.२०१६ रोजी कोणताही पंचनामा केला नसल्याचे स्पष्ट व थेट कथन केले. या साक्षीदारांना सरकारी वकीलांनी भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे प्रश्न विचारले असता पंचनामा शाबीत होण्याईतपतचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

७. सा.क्र.३ मायाबाई या या प्रकणातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. मात्र त्यांनी

त्यांच्यासमक्ष कोणतीही घटना घडली नव्हती व पोलिसांनी त्यांचा बयान नोंदविला नाही असे स्पष्ट व थेट कथन केले. तसेच त्यांच्या जबाबातील अधोरेखांकित भाग–अ मधील मजकूराप्रमाणे घटना घडली नव्हती असे स्पष्ट कथन केले आहे.

८. सरकारी वकीलांनी दोषारोप पत्रामध्ये नमूद असलेल्या साक्षीदारांच्या विवरणावर साक्षीदार शेख मुस्ताख, ए.एस.आय. बमलोटे, पोशि रेवतकर, पोशि बडोदिया, परवेज शेख, राजेंद्र डहाके यांना तपासणार नसल्याचे स्पष्ट लिहून दिले आहे. ईतर साक्षीदारांना निशाणी १९ ते २२ तसेच २४ ते ३७ प्रमाणे समन्स पाठविले असता पोलिसांनी त्याची बजावणी केली नाही व बजावलेले साक्षीदार प्रकरणात हजर झाले नाही. तपासी अधिकारी यांनाही वारंवार समन्स काढले असता ते हजर झाले नाही. तसेच निशाणी ३७ प्रमाणे साक्षीदार सेवक हुड हा मयत झाल्याचा अहवाल संबंधीत कर्मचा–याने दाखल केला आहे.

९. वरील पुराव्यावरुन आरोपींनी फिर्यादीच्या कंपनीतील खत चोरून नेले हे शाबीत होण्यासाठी अभिलेखावर कोणताही थेट व परिस्थितीजन्य पुरावा आलेला नाही. त्यामुळे आरोपींनी चोरी केली हे तथ्य निसंशयपणे शाबीत झालेले नाही. अशा परिस्थिती मध्ये आरोपीं विरुध्द निश्चीत केलेले दोषारोप शाबीत करण्याकरीता पुरेसा पुरावा उपलब्ध नाही. त्यामुळे आरोपींनी गुन्हा केला हे शाबीत होत नाही. सबब मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर नकारार्थी देतो.

<u>मुद्दा क्रमांक ३ करीता</u> –

१०. अभियोग पक्षाने भादंवि कलम ३८०, ४६१, ३४ अन्वयेच्या दोषारोप शाबीती साठी आवश्यक असणारे घटक शाबीत केलेले नाही. सबब आरोपींना सदर दोषारोपातून दोषमुक्त करणे न्यायोचित होईल.

११. प्रस्तुत प्रकरणी फौ.प्र.सं. कलम ३१३ अन्वये आरोपींचे निवेदन वगळण्यात आल्याबाबतचा आदेश निशाणी १ वर करण्यात आला. सरकारी वकीलांनी युक्तीवादा दरम्यान आरोपीं विरुध्द तीनही साक्षीदारांनी काहीही कथन केले नसल्याचे थेटपणे कथन केले. सदरचे प्रकरण विनाकारण प्रलंबित ठेवणे आवश्यक नसल्याचे दिसून येते.

तसेच जप्त मुद्देमाल एक टाटा एस गाडी क्र.MH-36-G-625, डि.ए. पीग्रोवर

गोदावरी सल्फेट खताच्या बो–या एकूण २४ त्याच्या मुळ मालकाला परत देण्यात यावा व दिला असल्यास त्याचा ताबा कायम करण्यात यावा. एक सेंद्री रंगाची ताडपत्री मुल्यहिन असल्याने नष्ट करण्यात यावी. सबब मुद्दा क्रमांक ३ करीता मी पुढील आदेश पारीत करतो.

**आदेश**

१) आरोपी क्र.१ प्रितम बबनराव पोटभरे, आरोपी क्र.२ सचिन रामप्रसाद काळे व आरोपी क्र.३ जानू समशेर सिद्दीकी यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७१(१) अन्वये भारतीय दंड विधान चे कलम ३८० व ४६१ सह कलम ३४ अन्वये अपराधाच्या आरोपातून निर्दोषमुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपींचा जामीनकदबा रद्द करण्यात येतो.

३) भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ च्या अनुपालनास्तव आरोपींनी प्रत्येकी रुपये १०,०००/– चा वैयक्तीक जात मुचलका दाखल करावा व तो पुढील सहा महिन्यापर्यत वैध राहिल व त्यानंतर रद्द होईल.

४) जप्त मुद्देमाल एक टाटा एस गाडी क्र.MH-36-G-625, डि.ए. पीग्रोवर गोदावरी सल्फेट खताच्या बो–या एकूण २४ त्याच्या मुळ मालकाला परत देण्यात यावा व दिला असल्यास त्याचा ताबा कायम करण्यात यावा. एक सेंद्री रंगाची ताडपत्री मुल्यहिन असल्याने नष्ट करण्यात यावी.

(सदरचा न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

MOHAN RAMCHANDRA KAMAT

Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2026.04.07 17:23:27 +0530

(मोहन रा. कामत )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
न्या.क्र.१, कामठी

दि.०७/०४/२०२६

**–: प्रमाणपत्र :–**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. निकालपत्र आदेश यामधील सर्व मजकूर मूळ निकालपत्र आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | पायल ग. अंड्रस्कर |
| न्यायालयाचे नांव | मोहन रा. कामत<br>(प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी, न्यायालय क्र. १ कामठी) |
| टाईप केल्याचा दिनांक | ०७.०४.२०२६ |
| न्यायिक अधिका–यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | ०७.०४.२०२६ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | ०७.०४.२०२६ |